# सॅमबाबांचे पंचतंत्र

खूप पूर्वीची गोष्ट आहे. २० व्या शतकात वारणानगर या गावी एक विक्षिप्त व चमत्कृतीपूर्ण व्यक्ती २० वर्षे वास्तव्य करून होती. तिचे नाव सॅमबाबा. सॅमबाबांनी श्री वारणा विद्यालयाचे प्राचार्य म्हणून काम केले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सॅमबाबांनी त्यांच्या कृती आणि उक्तीमधून अनेक मौलिक व जीवनावश्यक सूत्रे शिकवली. गावातले लहानथोर सर्वच त्यांचे विद्यार्थी होते. त्यांची मौलिक शिकवण कालातीत तर आहेच, किंबहुना आजच्या युगात जास्त लागू आहे. सॅमबाबांची केवळ ५ सूत्रे आपण विचारात घेऊ.

## सूत्र एकः शिस्त व चांगल्या सवयी

सॅमबाबांच्या कडक शिस्तीला कंटाळला नाही असा त्यांचा एकही विद्यार्थी किंवा पालक नसेल. पण मागे वळून पाहता व थोडा विचार करता असे ध्यानात येते की, सॅमबाबांना आम्हाला नुसतीच खाकी शिस्त लावायची नव्हती, तर चांगल्या सवयींचे महत्त्व दाखवायचे होते. मराठीत ‘‘कळतं पण वळत नाही’’ अशी म्हण आहे. म्हणजे काय तर निसर्गाने आपणा सर्वांना ‘मेंदू’ नावाचा अवयव दिला असल्याने काही गोष्टींचे महत्त्व लगेच कळते जसे की आरोग्य, मित्रसंपदा, ज्ञानार्जन, कार्यक्षमता, इत्यादी. या गोष्टी आपल्याला हव्याहव्याशा वाटतात. त्या साध्य करण्याचे शेकडो मार्गही आजकाल पुस्तकांतून किंवा नेटवर उपलब्ध आहेत. पण ‘सवय’ लावल्याशिवाय यातले काहीही साध्य होत नाही. सवय म्हणजे काय तर विचार न करता केलेली कृती. उदाहरणार्थ सकाळी उठल्यावर तोंड धुवायचे की नाही असा विचार करत न बसता आपण ती कृती करून टाकतो. सॅमबाबादेखील आम्हाला कधीच या शिस्तीचे किंवा सवयींचे महत्त्व पटवून द्यायच्या भानगडीत पडले नाहीत. विचार न करता हे नियम रोज पाळायचे, बस ! अशी ही सॅमबाबांची ‘‘चांगल्या सवयींची’’ शिकवण आमच्यातले काही सूज्ञ विद्यार्थी काही प्रमाणात शिकले व त्याचा पडताळा त्यांना पुढच्या आयुष्यात आला.

***तेव्हा सूत्र क्रमांक एकः एखादी गोष्ट चांगली आहे हे ‘‘कळले’’ की ती आचरणात/प्रत्यक्षात आणण्यासाठी काहीतरी ‘‘सवय’’ लावा, म्हणजे ती आपोआप ‘‘वळते’’ देखील! इंग्लिशमध्ये सांगायचे झाले तर Habit is the best way to get things done !***

## सूत्र दोनः स्वतंत्र विचार

सॅमबाबा स्वतः पारशी होते व त्यांची पत्नी एडनामावशी (ज्या आम्हाला इंग्लिश शिकवत) ख्रिस्ती होत्या. पण गंमत म्हणजे ही माहिती आम्हाला त्यांच्या कुठल्याच उक्तीतून किंवा कृतीतून मिळाली नाही. सॅमबाबांना गांधीजींविषयी आदर होता. पण त्यांनी आम्हाला सरसकट गांधीवादावर लेक्चर कधीच झोडले नाही. किंबहुना सॅमबाबा सर्वप्रकारच्या "वादां" पासून मुक्त होते. भारतीय संस्कृती थोर आहे म्हणजे आपले पूर्वज जे काही करत किंवा समजत ते सर्वच सरसकट योग्य होते, किंवा ब्रिटीशांनी आपल्यावर अत्याचार केले म्हणजे पाश्चात्य संस्कृती सरसकट हीनतेनी बरबटलेली आहे असे सॅमबाबांनी कधीच मानले नाही व आम्हाला तसा विचार करण्यास प्रवृत्त केले नाही. त्यांच्या २० वर्षांच्या कारकीर्दीत त्यांनी कधीच "अमुक हा मार्ग follow कर" किंवा "अमुक ही व्यक्ती थोर आहे" असे म्हटले नाही. कारण त्यांना माहीत होते की सर्व व्यक्तींमध्ये चांगले-वाईट दोन्ही असते. सर्व 'वाद' (धर्मसुद्धा) मानवनिर्मित असल्याने साहजिकच त्यांच्यातदेखील दोष असणे साहजिक आहे.

आजच्या युगात हा "स्वतंत्र विचार" अत्यंत आवश्यक आहे. "स्वतंत्र विचार" म्हणजे काय तर कुठल्याही वादास (ज्याला इंग्रजीत ideology किंवा dogma असे म्हणतात) प्रमाण न मानणे किंवा कुठल्याही व्यक्तीच्या – मग ती कितीही थोर असो – आहारी न जाणे. आपले नेते व गुरु आपल्याला विविध मार्गांकडे "नेऊ" इच्छितात. पण ते मार्ग योग्य आहेत का हा "स्वतंत्र विचार" आपण प्रत्येकाने करणे आवश्यक आहे.

***तेव्हा सूत्र क्रमांक दोनः तुमच्या मेंदू नामक अवयवाचा वापर करून कानावर पडणारे, नजरेस दिसणारे तपासून पाहा, पटले तरच स्वीकारा. कुणाच्याही किंवा कशाच्याही आहारी जाऊ नका. हे "वैचारिक स्वातंत्र्य" आयुष्यभर टिकवा. इंग्लिशमध्ये सांगायचे झाले तर Maintain your intellectual and spiritual freedom, avoid becoming a slave to any person or ideology.***

## सूत्र तीनः समभाव व संवेदनशीलता

सॅमबाबांनी सर्व विद्यार्थ्यांकडे समभावाने पाहिले. गरीब-श्रीमंत, मुलगा-मुलगी, सज्जन-मवाली, पुस्तकी किडा-खेळाडू, सर्वांना सारखेच वागवले. सर्वांनीच सॅमबाबांची शिक्षा भोगली किंवा कौतुक (तुरळक का असेना) उपभोगले. हुशार विद्यार्थ्याने खेळ चुकवल्याबद्दल थोबाडीत खाल्ली व श्रीमंत घरातल्या विद्यार्थ्याला महागड्या कापडाची चड्डी घातल्याबद्दल नुसत्या शर्टवर घरी जावे लागले! सॅमबाबांच्या या गुणाविषयी अशा अनेक

कथा प्रचलित आहेत. त्या तुम्ही ऐकल्याही असतील. अर्थात समभाव हे तत्त्व आपण पुस्तकातूनही शिकतो आणि सर्वांना ते पटण्यासारखे आहे. पण सॅमबाबा एक पाऊल पुढे होते. त्यांचा दृष्टीकोन सर्व मानवजातीस समाविष्ट करणारा होता. त्यांचा सर्वसमावेशक समभाव आजच्या युगात अधिकच महत्त्वाचा आहे. राज्य, देश या सर्वाच्या पलीकडे जाऊन "आपली मानवजात" असा विचार होण्याची गरज आहे. आजच्या समस्या जसे की climate change – कुणा एका समुदायाच्या वा देशाच्या नसून सर्व मानवजातीच्या आहेत. इंटरनेट, जागतिक अर्थव्यवस्था अशा गोष्टी सर्वांच्याच जीवनाचा भाग झाल्या आहेत. त्यामुळे आपण जुन्या संकुचित तत्त्वांचा व प्रथांचा हेकटपणा सोडून या नवीन मानवतावादास सामोरे गेले पाहिजे.

तसेच नुसते सर्वांना नियम सारखेच लागू केले म्हणजे "समभाव" झाला असे नाही. तर "संवेदनशीलता" म्हणजे ज्यांना मदतीची गरज आहे, प्रोत्साहनाची गरज आहे, अशांना आपण मदतीचा हात दिला पाहिजे. सॅमबाबांची ही शिकवण त्यांच्या उत्तरायुष्यात जास्त प्रकर्षाने पाहाण्यात आली. त्यांच्या बंगलोरच्या वास्तव्यात त्यांना कधीही कुणीही भेटायला गेले किंवा फोन केला की सॅमबाबांचा पहिला प्रश्न असायचा: "अमुक अमुक व्यक्तीला मदतीची गरज आहे. तू त्यासाठी काय करू शकतोस?" असा मदतीचा हात आपण केवळ आपले स्नेही-नातेवाईकच नाही, तर दाराशी येण्याऱ्या प्रत्येक व्यक्तीला "समभावाने" दिला पाहिजे अशी सॅमबाबाची शिकवण आहे.

***तर सूत्र क्रमांक तीन: सर्वांप्रती समभाव ठेवा व संवेदनशीलतेने मदतीचा हात पुढे करा. इंग्लिशमध्ये सांगायचे झाले तर Open your heart to one and all.***

## सूत्र चार: साधेपणा

सॅमबाबा कायम छान सूट-बूट घालून हिंडायचे. त्यांना घराच्या बाहेर कधीच कुणी "साध्या" कपड्यात, म्हणजे लेंगा किंवा धोतर अशा कपड्यात, पाहिले नाही. तरीपण "साधेपणा" ही सॅमबाबांची महत्त्वाची शिकवण होती. ती कशी काय? "साधी राहणी, उच्च विचारसरणी" हे सुभाषित आपणा सर्वांना माहीत आहे. पण साधेपणा म्हणजे बावळटपणा नव्हे, दरिद्रीपणा नव्हे. सॅमबाबांच्या सुटामागे एक अत्यंत साधी व्यक्ती दडली होती. सूट घातल्यामुळे सॅमबाबांचे शिस्तप्रिय व नीटनेटके व्यक्तिमत्व खुलून यायचे, त्याला एक भारदस्तपणा यायचा, त्यांचे बोलणे लोक जास्त लक्ष देऊन ऐकायचे. बस्स एव्हढाच त्या सुटाचा उपयोग होता.

पण म्हणून सॅमबाबा इंग्रजी गोऱ्या माणसासारखे गर्विष्ठ नव्हते, आढ्यतेखोर, नखरेल नव्हते. ते दर ५ मिनिटांनी आरशात बघत टायची गाठ नीट करत नसत. सॅमबाबांच्या घरी वारणेत व बंगलोरमध्ये देखील त्या सुटाबुटाला शोभेल असे काहीच नव्हते. श्रीमंती वातावरण नव्हते. महागड्या वस्तू नव्हत्या. त्यांच्या बंगलोरच्या घरात जुना स्टोव्ह, प्राचीनकाळचा फ्रीज, अंधुक लाईटबल्ब असा आश्रमासारखाच माहौल होता.

पण साधेपणा म्हणजे दारिद्र्य नव्हे. सॅमबाबांचे आयुष्य समृद्ध होते. त्यांच्या घरात हजारो पुस्तके, गाण्यांच्या ध्वनिमुद्रिका, नामवंत कलाकारांची पेन्टींग्ज, अशा गोष्टींची रेलचेल होती. सॅमबाबांशी गप्पा मारताना संगीत, कला, राजकारण, तंत्रज्ञान, बागकाम, अगदी पाककलासुद्धा अशा सर्व विषयांना वाव असायचा. एडनामावशींना क्रिकेटसारख्या खेळांची अत्यंत आवड होती. काही बाबतीत आयुष्य साधे ठेवले – जसे की आपल्या भौतिक गरजा व राहणी – की दुसऱ्या अनेक बाबतीत ते आयुष्य श्रीमंत करता येते ही शिकवण सॅमबाबांनी दिली.

शाळेत सर्व विद्यार्थ्यांना एकसारखेच साधे युनिफॉर्म व चपला घालायला लावून सॅमबाबांनी साधेपणाची शिकवण दिली. मुलींनादेखील नेलपेन्ट किंवा मेंदी अशा गोष्टींना मज्जाव केला. पण त्यामागे चक्रमपणा नव्हता. तर भौतिक गोष्टींकडचे लक्ष नष्ट करून विद्यार्थ्यांनी ज्ञानार्जनात, खेळ खेळण्यात, इतरांशी मैत्री करण्यात, स्वतःची मानसिक उन्नती करण्यात लक्ष घालावे अशी अपेक्षा होती.

***तर सूत्र क्रमांक चारः आयुष्यातली गुंतागुंत कमी करा, साधेपणाचा अवलंब करून तुमचे जीवन समृद्ध करा. वाढत्या प्रलोभनांनी दिवसेंदिवस गुंतागुंतीच्या होत चाललेल्या आजच्या युगात हा साधेपणा विचारात घेण्याची निकड आहे. इंग्लिशमध्ये सांगायचे झाले तर Avoid complexity and materialism if you want to live a rich life.***

## सूत्र पाचः सार्वजनिक जाणीव

सॅमबाबांना एक विचित्र सवय होती. ते कधीही रस्त्यावर चालू लागले की रस्त्यावर पडलेला कचरा – कागदाचे बोळे इ. – उचलून आपल्या खिशात ठेवायचे. सुरूवातीला लोकांना वाटले की हे बहुतेक घरी जाऊन प्रत्येक बोळा उघडून त्याच्यावर काय लिहिले आहे वाचत असतील डिटेक्टिव्हप्रमाणे! पण कालांतराने उमजले की अरे हे तर झाडूवाल्याचे काम करताहेत, साफसफाई करताहेत. सॅमबाबांच्या सफाईबद्दल तर शेकडो रंजक गोष्टी आहेत. त्यांनी एकदा कसे एका उच्चभ्रू माणसाला त्याची थुंकी साफ करायला लावली वगैरे. पण नुसतीच सफाई नव्हे, तर सॅमबाबा पब्लिकमध्ये असताना इतरही विचित्रपणा करायचे. रात्री

सायकलवाला दिसला की त्याला उतरायला लावून तुझ्या सायकलला दिवा कुठेय असे दरडावून विचारायचे.

या सगळ्या विक्षिप्तपणात सॅमबाबांची सार्वजनिक जाणीव, किंवा ज्याला इंग्लिशमधे civic sense म्हणतात, ती दिसते. Civic sense म्हणजे दुसऱ्याची – मग तो इसम ओळखीचा असो वा अनोळखी – कदर करणे, त्याचा विचार करणे, त्याची गैरसोय आपण करत नाही ना असा विचार करणे. सार्वजनिक जागा – जसे की रस्ते, बाग/बगीचे, टॉयलेट, सार्वजनिक लायब्ररी, सरकारी इमारती इ. – या केवळ आपल्यासाठी नसून इतरांसाठी पण आहेत, आणि म्हणून त्यांची निगा राखणे, त्या घाण न करणे, हे आपले कर्तव्य मानणे याला civic sense म्हणतात. आपल्या सायकलला किंवा गाडीला दिवा नसेल तर रात्री एखादा म्हातारा-कोतारा अपघातात सापडू शकतो असा विचार करणे याला civic sense म्हणतात. दुर्दैवाने हा civic sense आपल्यात अभावानेच आढळतो. सॅमबाबांनी ही महत्त्वाची शिकवण त्यांच्या वागण्यातून आम्हाला देण्याचा प्रयत्न केला.

***तेव्हा सूत्र क्रमांक पाचः civic sense म्हणजे काय तर इतरांचा विशेषतः अनोळखी लोकांचा – विचार करणे. त्यांना सौजन्य दाखवणे. सार्वजनिक जागांची शुचिता सांभाळणे.***



**सॅमबाबांची कार्यभूमी**



**सॅमबाबा**

*Author: Abhay B. Joshi*
*(Email: abjoshi@yahoo.com, WhatsApp: +1 425 623 7996)*